<u>अत्यंत महत्वांचे</u>

क्र.यजिप/आरोग्य/आस्था-१/वशि/ १०५१ /२०२२
यवतमाळ जिल्हा परिषद यवतमाळ
(आरोग्य विभाग)
यवतमाळ दिनांक ५ /०५/२००२२

प्रति,

१) गटविकास अधिकारी
पंचायत समिती ---------------- (सर्व)
२) तालुका आरोग्य अधिकारी
कार्यालय ------------------ (सर्व)
३) वैद्यकिय अधिकारी
प्राथमिक आरोग्य केंद --------------- (सर्व)

विषय :- **आरोग्य विभागाअंतर्गत सन -२०२२ चे सार्वत्रीक बदल्या बाबत अंतीम वास्तव्य सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणे बाबत.**

संदर्भ :-१. शासन निर्णय ग्रामविकास विभाग मंत्रालय,मुंबई दि.१५ मे २०१४
२.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांचे पत्र क्र.यजिप/साप्रवि/आस्था-४/कावि-५६६/२२ दि.२१.३.२०२२
३. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांचे पत्र क्र.यजिप/साप्रवि/आस्था-४/कावि-८०८/२२ दि.२२.४.२०२२
४. या कार्यालयाचे पत्र क्र.यजिप/आरोग्य/आस्था-१/वशि -९८७/२२ दि.२८.४.२०२२

उपरोक्त संदभीय विषयान्वये संदर्भीय क्र.१ चे शासन निर्णय आणि संदर्भ क्र.२ चे पत्रानुसार सर्वसाधारण बदल्या-२०२२ कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार तालुक्यास्तरावरुन प्राप्त झालेल्या माहीती नुसार या कार्यालयाचे संदर्भ क्र.४ चे पत्रानुसार ७ संवर्गातील आरोगय कर्मचा-यांच्या **तात्पुरती वास्तव्य सेवा जेष्ठता यादी** प्रसिध्द करण्यात आलेलया आहे. सदर पत्रान्वये दि.४.५.२०२२ पर्यंत तात्पुरत्या सेवा जेष्ठता यादीवर कर्मचा-यांचे आक्षेप / हरकती मागविण्यात आलेल्या आहे.

वरील प्रमाणे तात्पुरत्या सेवा जेष्ठता यादीवर प्राप्त आक्षेपानुसार दुरुस्त्या करण्यात येवुन बदलीपात्र आरोगय कर्मचा-यांच्या सर्वसाधारण बदल्या -२०२२ करीता खालील संवर्गाच्या अंतीम सेवा जेष्ठता यादया तयार करण्यात आलेल्या आहे. **१.विस्तार अधिकारी (आ.) २.प्रयोगशाळा वैज्ञनिक अधिकारी ३.औषध निर्माण अधिकारी ४.आरोगय सहा (पुरुष ) ५.आरोग्य सहा.(महीला) ६.आरोग्य सेवक (पु.) ७.आरोग्य सेवक (महीला) या ७ संवर्गाची बदलीपात्र कर्मचा-यांची अंतीम वास्तव्य सेवा जेष्ठता यादी तयार करुन जिल्हा स्तरावरुन प्रसिध्द करण्यात येत आहे.**

सदरची जेष्ठता यादी आपले कार्यालयाच्या दर्शनी भागावर /नोटीस बोर्डावर तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी. या सोबतच्या जेष्ठता यादया सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुरविण्याची जबाबदारी सर्व तालुका आरोग्य अधिकारी यांची राहील तसेच बदली पात्र आरोग्य कर्मचा-यांची अंतीम जेष्ठता यादी संबधित सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन दयावी व त्याची पोच घेण्यात यावी.

**सहपत्र :- अंतीम सेवा जेष्ठता यादी - २०२२.**

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ

प्रतिलीपी :-
१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांना माहिती करीता सविनय सादर.
२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जि.प.यवतमाळ यांना माहीती करीता समादाराने सादर.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ